Jagdamba Education Society's

Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 30/05/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

# दिनविशेष



## इतिहासकार डॉ. पांडुरंग सखाराम पिसुर्लेकर

पांडुरंग सखाराम पिसुर्लेकर हे गोव्यातील एक प्रसिद्ध इतिहासकार होते. त्यांचा जन्म ३० मे १८९४ रोजी गोव्यातील शेणवी कुटुंबात पिसुर्ले (ता. सत्तरी) येथे झाला. त्यांचे शिक्षण साखळी व पणजी येथे झाले. शिक्षकीपेशाचे प्रशिक्षण व वकिलीचे शिक्षण घेऊनही सुरुवातीस त्यांनी बिचोली येथे प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून काम केले. पिसुर्लेकरांचे सर्व शिक्षण पोर्तुगीज भाषेमधून झाले होते, तथापि त्यांना इंग्रजी, फ्रेंच, कोकणी, संस्कृत या भाषा तसेच मोडी लिपी चांगल्या प्रकारे अवगत होती. त्यांचे लेखन मुख्यत्वे मराठी व पोर्तुगीज या दोन भाषांतच आढळते. शिक्षकीपेशानंतर त्यांनी पणजीच्या अभिलेखागारात काम पत्करले (१९३१). या अभिलेखागाराच्या संचालकपदावरुन ते १९६१ मध्ये निवृत्त झाले. पिसुर्लेकरांनी या अभिलेखागाराखालील दप्तरखाना सुधारला, त्यातील कागदपत्रे खंडवार लावली आणि त्यासंबंधी सूची व दोन मार्गदर्शिका प्रसिध्द केल्या. गोवा स्वतंत्र झाल्यानंतर मुंबई विद्यापीठाने पणजी येथे इतिहास संशोधनकेंद्र स्थापन केले. त्याचे संचालकपद पिसुर्लेकरांकडे होते.

पिसुर्लेकरांनी स्फुटलेख व शोधनिबंध याव्यतिरिक्त अनेक पुस्तके लिहिली. त्यांचे लेखन मुख्यत: पोर्तुगीज भाषेत असून त्याचे मराठी व इंग्रजी भाषांत भाषांतर झाले आहे. त्यांचा पोर्तुगीज-मराठे संबंध व पोर्तुगीजांच्या दप्तरांतील मराठ्यांचा इतिहास (१९६७) हे पुस्तक महत्वाचे असून मराठ्यांच्या इतिहासावर त्यांनी नवीन प्रकाश टाकला आहे. पिसुर्लेकरांना लेखनसंशोधनाबद्दल अनेक मानसन्मान मिळाले. पोर्तुगाल शासनाने त्यांना 'नाइट ऑफ द मिलिटरी ऑर्डर ऑफ सँटिएगो' हा किताब दिला (१९३५). याशिवाय रॉयल एशिॲटिक सोसायटी (बंगाल) आणि एशिॲटिक सोसायटी (मुंबई) यांनी त्यांना सुवर्णपदके दिली (१९४८ व १९५३). लिस्बन विद्यापीठाने डी. लिट्. ही सन्मान्य पदवी त्यांना देऊन त्यांचा यथोचित गौरव केला. पांडुरंग पिसुर्लेकर यांचे १० जुलै १९६९ रोजी पणजी येथे निधन झाले.

Nashik Edition

May 30, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401